| पुणे पोलीस | **वाहतुक शाखा, पुणे शहर**<br>**पोलीस उप आयुक्त, वाहतुक यांचे कार्यालय,**<br>**बंगला नं ६ येरवडा पोस्ट ऑफीस शेजारी, पुणे** | PUNE CITY TRAFFIC POLICE |
|---|---|---|

जावक क्रमांक –पोउपआ/वाह/नियो./ १६८२ /२०२४ दिनांक :- ०२/०३/२०२४

## प्रेसनोट

गणेशखिंड रोडवर पुणे विद्यापीठ चौकामध्ये उड्डाणपूल व मेट्रो बांधकाम काम सुरू आहे. त्यामुळे दोन्ही बाजुचा रस्ता अरुंद झालेला असल्यामुळे गणेशखिंड रोडवर वाहतूक कोंडी होत आहे. वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी गणेशखिंड रोड वरील वाहतूकीमध्ये बदल करणे गरजेचे आहे.

याकरीता महाराष्ट्र शासन गृह विभाग क्र.एम.व्ही. ए.०१९६/८७१/ सीआर-३७/टीआरए-२, दिनांक २७/०९/१९९६ चे नोटीफिकेशन नुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६(१) (ए) (बी), ११६(४) आणि ११७ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करुन मी शशिकांत बोराटे, पोलीस उप-आयुक्त, वाहतुक, पुणे शहर गणेशखिंड रस्त्यावर **दिनांक ०४/०३/२०२४ रोजी दुपारी १२:०० वा. पासुन वाहतूकीमध्ये अत्यावश्यक सेवेतील वाहने वगळुन तात्पुरत्या स्वरूपात प्रायोगीक तत्वावर बदल करीत आहे.** सदर ठिकाणी यापुर्वी असलेले वाहतूकीचे सर्व आदेश रद्द समजण्यात येतील.

१. पुणे विद्यापीठ चौकामधुन गणेशखिंड रोडने सेनापती बापट रोड कडे जाणाऱ्या वाहनांसाठी सेनापती बापट रोड जंक्शन येथून उजवीकडे प्रवेश बंद राहील.

- ➢ वाहनचालकांनी कॉसमॉस बँकेसमोरून यु टर्न घेवून सेनापती बापट रोड जंक्शन वरून डावीकडे वळण घेवून जावे.

२. शिवाजीनगर कडुन गणेशखिंड रोडवर येणाऱ्या व रेंज हिल्स्कडे जाणाऱ्या वाहनांसाठी रेंज हिल्स् कॉर्नर येथे उजवीकडे प्रवेश बंद राहील.

- ➢ वाहन चालकांनी कॉसमॉस बँकेसमोरून यु टर्न घेवून रेंज हिल्स् कॉर्नर येथून डावीकडे वळण घेवून रेंज हिल्स् कडे जावे.

३. पुणे विद्यापीठ ते बाणेर कडे जाणारा बाणेर रोड हा पोलीस पेट्रोल पंपापर्यंत बफर रोड करण्यात येत आहे. सकाळी ०७:०० ते १२:०० वा. पर्यंत नमुद रस्त्यावरील वाहतूक विद्यापीठ चौकाकडे सुरू राहील. व १२:०० ते सकाळी ०७:०० वा. पर्यंत वाहतूक बाणेरकडे सुरु राहील.

- ➢ सकाळी ०७:०० ते १२:०० या वेळेमध्ये पुणे विद्यापीठ चौकामधुन बाणेर कडे जाणाऱ्या वाहन चालकांनी पाषाण रोडवरून अभिमानश्री जंक्शन मार्गे बाणेरकडे जावे.

**खालील मार्गावर सर्व प्रकारच्या जड, अवजड वाहने, ट्रक, ट्रेलर्स, कंटेनर्स यांना २४ तास प्रवेश बंद राहील.**

अ) गणेशखिंड रोडवरील चाफेकर चौक ते पुणे विद्यापीठ चौक
ब) औंध रोडवरील ब्रेमेन चौक ते पुणे विद्यापीठ चौक
क) बाणेर रोडवरील अभिमानश्री चौक ते पुणे विद्यापीठ चौक
ड) पाषाण रोडवरील अभिमानश्री चौक ते पुणे विद्यापीठ चौक

४. भाजीपाला वाहतूक करणारे तीनचाकी पिकअप, तसेच तीनचाकी, चारचाकी मालवाहतूक करणारी सर्व प्रकारची वाहने, स्लो मुव्हींग वाहने उदा. डंपर, मिक्सर, जे.सी.बी., रोड रोलर व इतर वाहने यांना **सकाळी ०८:०० ते १२:०० व १६:०० ते २२:०० वा. दरम्यान प्रवेश बंद राहील**

2.3.24
**( शशिकांत बोराटे )**
पोलीस उप-आयुक्त, वाहतूक
पुणे शहर

**प्रत :- सर्व संबंधितांना**